# अधिसूचना

महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांकः२८ सप्टेंबर, १९९८

**खाणी व खनिजे (विनियमन व विकास) अधिनियम, १९५७.**

क्रमांकः गौखनि-१०९७/प्र.क्र.३३३/ख, खाणी आणि खनिजे (विनियमन व विकास) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) याच्या कलम १५ ची पोटकलमे (१) आणि (३) यांद्वारे महाराष्ट्र शासनास प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, याद्वारे मुंबई गौण खनिज उत्खनन नियम, १९५५ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढीलप्रमाणे नियम करीत आहे.

१) या नियमांस मुंबई गौण खनिज उत्खनन (सुधारणा) नियम, १९९८ असे म्हणावे.

२) मुंबई गौण खनिज उत्खनन नियम, १९५५ मधील नियम ३९-ब नंतर पुढील नियम समाविष्ट करण्यात येईलः-

''३९-क'' या नियमांच्या पूर्वगामी उपबंधांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी यथास्थिती ग्रामपंचायत किंवा पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद यांच्या पूर्व शिफारशीने असेल त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत सक्षम अधिका-याने अनुसूचित क्षेत्रामध्ये गौण खनिजाचे उत्खनन करण्यासाठी पूर्वेक्षण लायसन्न वा खनिपट्टा देणे अथवा लिलावाने गौण खनिजाचे पूर्वेक्षण करण्यासाठी सवलत देणे किंवा अनुसूचित क्षेत्रात अशा प्रकरणात किंवा प्रकरणाच्या वर्गात गौण खनिज काढून घेण्याचा अधिकार वितरीत करणे विधीसंमत असणार नाही.

**स्पष्टीकरण :-** या तरतूदीच्या प्रयोजनाकरीता

१) ''पंचायत'' आणि ''अनुसूचित क्षेत्र'' या शब्दप्रयोगांचे त्यांना मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच असतील.

२) ''पंचायत समिती'' आणि ''जिल्हा परिषद'' या शब्दप्रयोगांचे अर्थ त्यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(प्र.का.बर्वे)
कक्ष अधिकारी,
महसूल व वन विभाग.

## NOTIFICATION

Revenue and Forests Department
Mantralaya, Mumbai-400 032,

Dated the 28 Sept. 1998.

Mines and Minerals (Regulation and Development) Act, 1957.

No. MMR-1097/CR-333/Kh- In exercise of the powers conferred by sub-sections (1) and (3) of Section 15 of the Mines and Minerals (Regulation and Development) Act, 1957 (67 of 1957), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Minor Mineral Extraction Rules, 1955, as follows, namely :-

1. These rules may be called the Bombay Minor Mineral Extraction (Amendment) Rules, 1998.

2. After Rule 39-B of the Bombay Minor Mineral Extraction Rules, 1955 the following rule shall be inserted, namely :-

"39-C". Notwithstanding anything contained in the foregoing provisions of these rules it shall not be lawful for a competent officer to grant prospecting licence or mining lease for minor minerals in the Scheduled Areas or to grant concession for exploitation of minor minerals by auction or otherwise dispose of the right to remove any minor minerals in such cases or class of cases in Scheduled Areas except with the prior recommendation of Panchayat or Panchayat Samiti or Zilla Parishad as the case may be.

Explanation:- For the purpose of this provision -

(i) the expression "Panchayat" and "Scheduled Areas " shall have meanings, respectively assigned to them in the Bombay Village Panchayats Act, 1958.

(ii) The expressions "Panchayat Samiti" and " Zilla Parishad" shall have meanings respectively assigned to them in the Maharashtra Zilla Parishads Panchayat Samities Act, 1961.

By order and in the name of the Governor of Maharashtra

Barve

( P. K. Barve)
Desk Officer,
Revenue and Forests Department.